मागणी क्र.झेडजी-३, प्रधानशीर्ष २२२५ अंतर्गत “महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास सहायक अनुदान देण्याकरिता” नवीन लेखाशीर्ष उघडण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांक : इमाव-२०१८/प्र.क्र.९० (भाग -१) /महामंडळे
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १७ मे, २०१९

प्रस्तावना :

मंत्रिमंडळाच्या दि. १५/०१/२०१९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडाळास रु. २५०.०० कोटी इतके “सहायक अनुदान” पुढील ३ वर्षांमध्ये उपलब्ध करून देणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने, दि. २८/०१/२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्यास अनुसरून नवीन लेखाशिर्ष उघडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

“महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास सहायक अनुदान देण्याकरिता” मागणी क्र.झेडजी-३, प्रधान शीर्ष २२२५ अंतर्गत नवीन उप शीर्ष उघडण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नवीन लेखाशीर्षाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

शीर्षक	लेखाशीर्षाचे मराठी नाव	लेखाशीर्षाचे इंग्रजी नाव
मागणी क्र.	झेडजी-३	ZG-03.
प्रधान लेखाशीर्ष	२२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण	2225, Welfare of scheduled castes, scheduled tribes, other backward classes and minorities
उपप्रधान लेखाशीर्ष	०३, मागासवर्गीयांचे कल्याण	03 , Welfare of backward classes
गौण शीर्ष	१०२, आर्थिक विकास	102, Economic Development
गट शीर्ष	(०१) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांचे कल्याण	(1) Welfare of Vimukt jati, Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Classes
उप शीर्ष	(०१)(०५) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास सहायक अनुदान	(01)(05) Grant in Aid to Maharashtra State Other Backword Classes Finance and Development Corporation
अनिवार्य/कार्यक्रम	(कार्यक्रम)/दत्तमत	Scheme/Voted
संगणक सांकेतांक	२२२५ एफ २५४	2225 F 254

२. हे आदेश महालेखापाल कार्यालय (लेखा व हकदारी) - १, महाराष्ट्र, मुंबई यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ख.वि/चा-१/विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग/युओआर-२१०/२०१८-१९/०६, दि.०२/०४/२०१९ तसेच, वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र. ५२/ व्यय - १४, दि. २६/०२/०१९ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलबध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०५२११५०६२४११२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.05.21 15:14:08 +05'30'

(भा.र.गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत, माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) एक/दोन, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (TM Section) महाराष्ट्र, मुंबई
३) कार्यासन व्यय-१४ / अर्थसंकल्प-५, वित्त विभाग मंत्रालय, मुंबई
४) कार्यासन-१४१३, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
५) व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ
६) निवड नस्ती.